दैनिक

# लोकआरंभ

लोकक्रांतीचा आरंभ

LOK AARAMBH

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

dainiklokaarambh@gmail.com

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २९ डिसेंबर २०२४ | अंक २० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# संतोष देशमुख हत्या प्रकरणी न्यायासाठी विराट मोर्चा




## धनंजय मुंडेंना मंत्री मंडळांत रहाण्याचा अधिकार नाही

: संतोष देशमुख यांना घालविण्याचे काम परळी वाल्यांनी केले. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीच झाली पाहिजे. तसेच काही कंपन्या गुंड पाळत असून त्याची चौकशी करावी. खंडणीखोरचा मास्टरमाईंड कोण? धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात रहाण्याचा अधिकार नाही. तुम्ही खरे असाल तर राजीनामा द्या? तुम्हाला पदे आमचे मुडदे पाडण्यासाठी पाहिजे का? असा सवाल विचारत या गुंडाच्या पाठीशी सरकार आहे. जातीच्या नावा शिवाय तुमच राजकारण चालत नाही त्यामुळे जातीचा आधार तुम्ही घेता आम्हाला नाही. २० दिवस झाले तरी तो सापडत नाही. तो शासना पेक्षा मोठा आहे का? तो घरातच बसलाय त्याला पकडा, संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी एक राहा. २ तारखेपर्यंत मास्टर माईंडला अटक झाली नाही तर मी उपोषण करणार असून, न्याय मिळेपर्यंत शांत बसणार नाही.

**– खा.बजरंग .सोनवणे**

बीड । किज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी फरार असलेले आरोपींना अटक करुन त्यांना फाशी द्यावी या मागणीसाठी शनिवारी (दि.२८) बीड येथे सर्व जातीच्या जनतेचा व सर्व पक्षीय विराट मोर्चा काढला. हा मोर्चा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन मोर्चाला सुरुवात झाली. हा मोर्चा माळीवेस चौक, सुभाष रोड, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. येथे याचा सभेत रुपांतर होऊन यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करीत मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले. यावेळी आंदोलनांमध्ये मोठा रोष दिसून आला तसेच हातात काळे झेंडे आणि विविध मागण्यांचे फलक होते. सर्वांची एकच मागणी होती ती फरार आरोपींना अटक करुन फाशी द्या. किरकोळ वाद सोडवून परिसरात शांतता कायम रहावी यासाठी प्रयत्न करणारे सरपंच संतोष देशमुख यांची काही गुंडांनी अपहरण करुन त्यांना अमानुष मारहाण करुन अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या केली. या घटनेला १९ दिवस झाले असले तरी यातील आरोपी आणि सुत्रधार फरार आहेत. या फरार आरोपींचा शोध लावून त्यांना फाशी द्यावी या मागणीसाठी सर्व पक्षीय व जाती धर्माच्या लोकांचा विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये फक्त बीड जिल्हाच नव्हे तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नागरिक उपस्थित होते. यावेळी मोर्चामुळे अख्खे बीड शहर जाम झाले होते. तब्बल तीन किलोमीटर रांग होती. तर आंदोलनांमध्ये मारेकऱ्यांबाबत प्रचंड रोष दिसून आला. हातात केळे झेंडे घेऊन आंदोक आंदोलनात पोहोचले होते. विविध फलक हातात घेऊन त्यामाध्यमातून विविध मागण्या लक्ष वेधून घेत होते. अनेकांनी यावेळी बीड जिल्ह्यातील दहशतीवर भाष्य करीत आरोपींना अटक करुन फाशी देण्याची मागणी केली. १८ दिवस झाले तरी आरोपी का सापडत नाही. असा प्रश्न उपस्थित करीत पोलिसांवर संशय व्यक्त करीत आरोपी जर नाही पकडले तर मुंबईला धडक देऊ अशी प्रतिक्रिया महिलांनी उपस्थित केली. या मोर्चाच्या गर्दीने आजपर्यंत सर्व मोर्चांचे रेकॉर्ड मोडल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. या मोर्चामध्ये महिला व मुलांची लक्षणीय उपस्थिती होती. जिल्हाधिकारी कार्यालय येथे मोर्चा धडकल्यानंतर मान्यवरांची भाषणे झाली. यानंतर विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

माझ्या वडीलांना न्याय मिळाला पाहिजे आणि दोषींना शिक्षा झाली पाहिजे यासाठी आपण मोठ्या संख्येने आलात याबद्दल आभार व्यक्त करीत माझ्या वडीलांची हत्या दलित बांधवाची मदत केल्याने झाली आहे. ही वेळ कोणत्याही लेकीवर येऊ नये यासाठी आपल्याला ठाम भूमिका घेऊन एकजूट कायम ठेवायची आहे. माझ्या वडीलांना न्याय मिळेपर्यंत लढा द्यायचा आहे. ही एकजुट कायम ठेवून आम्हाला सहकार्य करा. – **वैभवी संतोष देशमुख**

संतोष देशमुख यांना न्याय नाही मिळाला तर जनतेच्या आक्रोशाचा सामना सरकारला करावा लागणार, ही लोकं सापाला दूध का पाजतात असा प्रश्न उपस्थित करून धनंजय मुंडे यांना टोला लगावला आहे. **–मनोज जरांगे पाटील**

मंत्री मुंडे यांना माहित आहे. बीड जिल्ह्यातील अन्यायाला संतोष देशमुख हत्येमुळे वाचा फुटली.
**–छत्रपती संभाजीराजे भोसल**

### वाल्मिक कराडला धनंजय मुंडेंच संरक्षण : आ.संदीप क्षीरसागर

अन्यायाच्या विरोधात हा मोर्चा असून, कराडच्या अटकेच्या मागणीसाठी जनता रस्त्यावर उतरली आहे. या कराडला धनंजय मुंडे हे संरक्षण देत असल्याचा आरोप केला. – आ.संदीप क्षीरसागर

वाल्मिक कराड रक्त पिपासू असून, याला सरकारच पाठीशी घालत असल्याचा आरोप करीत. जातपात काही नाही. हे सिरीयल किलर असून अनेक वंजाऱ्यांचे संसार याने उध्वस्त केले.बीडची जनता तशी सहनशील आहे. – **आ.जितेंद्र आव्हाड**

## अरूणा दगडूसाहेब चव्हाण (सूर्यवंशी) यांचे निधन



प्रतिनिधी अंबाजोगाई केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातल इंग्रजी विषयाच्या सहशिक्षीका अरूणा दगडूसाहेब चव्हाण (सूर्यवंशी) यांचे शनिवारी दुपारी अडीच वाजता अंबाजोगाई येथील संत भगवान बाबा चौक भागातील छत्रपती संभाजीनगर येथील राहत्या घरी शनिवारी दुपारी अडीच वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५६ वर्षाचे होते. मागील दहा वर्षापासून त्या केज तालुक्यातील युसुफवडगाव येथील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात इंग्रजीच्या सहशिक्षक म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन, असा परिवार आहे.माजी प्राचार्य व बीड जिल्ह्याचे राष्ट्रीय खेळाडू दगडूसाहेब चव्हाण यांच्या त्या पत्नी होतं.आज रविवारी सकाळी नऊ वाजता अंबाजोगाई शहरातील बोरूळ तलाव येथे त्यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



गेवराई – बीड शहरातील मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ हे कौटुंबिक कार्यानिमित्ताने गेवराई येथे गेले असता त्यांनी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांच्या जय हिंद लेडीज कलेक्शन या शॉपिंग सेंटरला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे हृदयी स्वागत करण्यात आले.

## संस्कार विद्यालयात डॉ.पंजाबराव देशमुख जयंती उत्साहात साजरी.



बीड ।भारतातील हरितक्रांतीचे जनक माजी कृषिमंत्री डॉ.पंजाबराव देशमुख यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ.पंजाबराव देशमुख आणि देवी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून ममगर ताईफ तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून मजाधव ताईफ उपस्थित होत्या. यावेळी दोन्हीही मान्यवरांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जीवनकार्या विषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली व मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला मा.मुख्याध्यापिका जाधव ताई, तिसरी चौथी विभागातील शिक्षकवृंद,कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मसाळुंके ताईफ्यांनी तर आभारप्रदर्शन म सौंदतीकर ताईफ यांनी केले

## मी ओबीसी आहे, पहिला ओबीसी आहे, विराट मोर्चात संदीप क्षीरसागर म्हणाले ?



त्या विंड मिलच्या प्रकारात तो वॉचमन बौद्ध समाजाचा होता. संतोष देशमुख मराठा समाजाचे होते. जेव्हा वॉचमनला तिथे मारहाण करण्यात आली. खंडणीसाठी वाल्मिक कराडचे गुंड लोक तिथे गेले. वॉचमनने त्यांना अडवलं म्हणून त्याला मारहाण केली. तिथे संतोष देशमुख यांनी उघड भूमिका घेऊन त्यांना रोखलङ्ग असं आमदार संदीप क्षीरसागर बीड येथील विराट मोर्चात सांगितलं. मी ओबीसी आहे. पहिला ओबीसी आहे, जो ठामपणे सांगतो, वाल्मिक कराडला आत टाका. गावच्या लोकांना जिल्ह्यातले सर्व आमदार भेटले, अधिवेशनात आवाज उठवू सांगितलंअसं संदीप क्षीरसागर म्हणाले.

सीएम साहेबांच्या जवळचे अभिमन्यू पवार यांना मी, जेव्हा ही घटना सांगितली, तेव्हा त्यांनी संभागृहात साथ दिली. हा जाती–पातीचा विषय नाही. सुरुवातीला म्हटलेलं राजकारण आणणार नाही, या सर्वांनी साथ दिली. मुख्यमंत्री तसच उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे बोलले, दोषी कोणी असेल तरी त्याला सोडणार नाही असं संदीप क्षीरसागर म्हणाले.

### अठरापगड जातीचे लोक घरचा माणूस गेला म्हणून एकत्र आले

अभिमन्यू पवार यांना मी बोललो होतो, लोकांमध्ये रोष आहे, हा जातीपातीचा मोर्चा नाही. हिंदू, मुस्लिम, बौद्ध अठरापगड जातीचे लोक आपल्या घरचा माणूस गेला, त्याला न्याय देण्यासाठी म्हणून जमले आहेत. एसपीची बदली झाली. दोन नंबरचे धंदे बंद झाले. पण वाल्मिक कराडला अजून अटक झालेली नाही. खंडणीमुळे कनेक्शन ३०२ लागतं. १९ दिवस होऊनही त्याला अटक झालेली नाहीङ्ग याकडे संदीप क्षीरसागर यांनी लक्ष वेधलं. ङ्गमी मंतदारसंघाचा दौरा केला. तेव्हा लोकांकडून मागणी आली, वाल्मिक कराडला धनंजय मुंडेंच संरक्षण आहे. हा खटला चालेपर्यंत धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी संदीप क्षीरसागर यांनी केली.

## वाल्मिक कराड बीडचा कार्यकारी पालकमंत्री होता, आमदार प्रकाश सोळंके यांचा खळबळजनक दावा

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यात रान पेटले आहे. आता बीडमध्ये मोर्चा निघाला आहे. वाल्मिक कराड याला राजाश्रय असल्यानेच त्याला अटक होत नसल्याचा गंभीर आरोप आमदार प्रकाश सोळंके यांनी केला आहे. मुख्यमंत्री इतर नेते वारंवार सांगतात आम्ही नि:पक्षपणे चौकशी करू, परंतु १९ दिवसानंतर आरोपी पकडले जात नाहीत, त्यामुळे बीडच्या जनतेत उद्रेक आहे. जे आरोपी आहेत ते मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचे आहेत. त्यांना पकडण्यात एवढी दिरंगाई होत असल्याने सर्वसामान्य माणूस अस्वस्थ आहे. सरकारला या यापूर्वीच इशारा देण्यात आला होता की आरोपीला तात्काळ अटक करा नाही तर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल असे ते म्हणाले. वाल्मीक कराड तर कार्यकारी पालकमंत्री यापूर्वी सुद्धा अनेकदा अजितदादांना भेटून बीडमधील सामाजिक राजकीय परिस्थिती कानावर घातली होती, असे प्रकाशदादा म्हणाले. धनंजय मुंडे राज्याचे मंत्री होते बीड जिल्ह्याचे पालकमंत्री होते त्यांनी जी व्यवस्था निर्माण केली,
त्याच्यामध्ये महत्त्वाचं नाव वाल्मीक कराडचं होतं. काही वर्तमानपत्रात वाल्मीक कराड यांना कार्यकारी पालकमंत्री असं म्हटलं आहे. इतक्या स्तरावर ही चर्चा होती, असे ते म्हणाले. वाल्मिक कराडचा प्रत्येक ठिकाणी हस्तक्षेपखंडणीच्या गुन्ह्यात वाल्मिक कराडचं नाव आलं. अनेक प्रशासनातील अधिकारी सांगायला लागलेत त्यांचा प्रत्येक ठिकाणी हस्तक्षेप होता. कुठल्या विभागाच्या अधिकार्यांना डायरेक्ट आदेश देऊन काम करायला लावायची वाल्मीक कराडचे प्रथा परंपरा होती. संतोष देशमुख यांची हत्या झाली त्याला सुद्धा खंडणीच प्रकरण कारणीभूत आहे, असे ते म्हणाले.आपण मध्यंतरी अजित दादांना फोन करून आरोपींना अटक होत नाही याबद्दल लोकांच्या मनात उद्रेक आहे याबाबत प्रयत्न करा अशी विनंती केली होती. वाल्मिक, धनंजय मुंडे यांच्या जवळचे आहेत, त्यांनी सांगितलं आहे. चार वर्षे पालकमंत्री असताना त्यांनी पूर्ण अधिकार त्यांना दिले होते, कार्यकारी पालकमंत्री म्हणून काही वर्तमानपत्रांनी त्याचं कौतुक केलं. जे काही घडले त्याच्यामध्ये धनंजय मुंडे यांची कार्यपद्धती जबाबदार आहे असं मला वाटतं, असा थेट आरोप प्रकाशदादांनी केला. त्यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

## संपादकीय

# बर्फाची गारीगार

बर्फाची मगारीगार त्यावेळी १ रुपयाला १ मिळायची. दुधाची २ किंवा ३ रुपयाला १ मिळायची. खाताना महाग असुनही दुधाची लगेच संपायची. म्हणुन माझ्यासारख्या ब–याच जणांचा कल बर्फाच्या दोन मगारीगारफ खाण्याकडे असायचा. आमच्या गावात गरीब घरातील जेम तेम बुद्धिमत्ता असलेलं पोरगं किंवा काही मढफ मुलं दहावीची परीक्षा झाली की गारेगार विकायचे. सुट्ट्या लागल्या की बर्याच मुलांचा हाच धंदा होता. मगारीगारफ विकण्यासाठी प्रथम स्वतःकडे सायकल असणे मनेसेसरीफ होतं. मग २०० किंवा ३०० अशी ठराविक अनामत रक्कम भरून कंपनीकडून मगारीगारीफसाठी जी पेटी लागायची ती मिळायची. कंपनीकडून मगारीगारफ मिळायची. कंपनी कसली ती एक गोडाऊन वजा दुकानच असायचं. मग सकाळी सायकलला गारेगारची पेटी व्यवस्थित बांधून सगळे दहावी बारावी झालेले गरजु – हौसे मगारीगारफ विकण्यास मार्गस्थ व्हायचे. निघताना मात्र त्यांच्यात विचारविनिमय होऊन धंदा चांगला व्हावा या हेतूने सर्वजणांनी एकाच गावात जाऊ नये असा एक दंडक होता. हा दंडक शक्यतो कोणी मोडत नसे. गावं ठरवून त्या त्या गावांमध्ये तो तो मगारीगारफवाला मसायकलफला असलेला भोंगा वाजवत जायचा. मगारीगारफची पेटी सायकलच्या कॅरियरवर ठेवलेली असताना कॅरियरवर मागच्या बाजुला जास्त वजन झाल्यामुळे सायकलचा बॅलन्स राखणं फार कसरतीचे काम असायचं. त्या काळामध्ये रस्ते प्रचंड बेकार होते. रस्ते कसले मसडकाफ होत्या त्या. अनेक मगारीगारफवाले माझ्यासमोर थोबाडावर पडलेले मी शाळेत असताना डोळ्याने पाहिलेले आहेत. मगारीगारफनाशवंत असतं. उन्हाने विरघळतं अदरवाइज फुटतं. अशा कंडीशनमध्ये सडकेवर उताराला एखाद्या खड्ड्यावर घसरून मगारीगारफवाल्याची सायकल घसरुन पडली तर मगारीगारफवाल्याचं फारच नुकसान व्हायचं. मगारीगारफवाले पडल्यानंतर त्यांना उठवण्यास मदत केल्यानंतर ते आपल्याला गारेगार देतील अशा लंगड्या महोप्सफ स्वाभाविकपणे वाटून जायच्या. पण मगारीगारफवाल्याच्या तंगड्या मोडल्या असताना अशा लंगड्या महोप्सफ बाळगण्यात काही अर्थ नव्हता. पण तरीसुद्धा काही चांगल्या स्वभावाचे मगारीगारफवाले अशा आणीबाणीच्या कंडिशनमध्येसुद्धा अनेक फुटल्या – तुटलेल्या मगारीगारीफ हातात द्यायचे त्यावेळी आनंद गगणात मावत नसे. पण काही खडूस मगारीगारफवाले मदत करूनसुध्दा मगारीगारफ देत नसत. अशावेळी मगारीगारफकडे आशाळभूत नजरेने आणि मगारीगारफवाल्याकडे मखाऊ का ठेवुफ अशा नजरेने पाहण्याशिवाय पर्याय राहत नव्हता. मगारीगारफ विकण्यासाठी अजून एक अलिखित क्रायटेरिया असायचा. ज्याला मगारीगारफ विकायचे अशा दहावी – बारावीच्या मुलाची शरीरयष्टी कमकुवत नसली पाहिजे. सायकल, पेटी आणि त्यावर बसलेला आपला बलदंड देह सांभाळणं सोपं काम नव्हतं. अशावेळी दहावी – बारावीलाच मांडीपोटर्यांवर काळेकुट्ट केस आलेल्या दांडदुड मुलांचंच हे काम होते. मगारीगारफवाला आमच्या गावात आला की अनेक लहान मुलांची मगारीगारफसाठी ममारामारफ व्हायची. मअण्णा पैसे द्याफ, मदादा पैसे द्याफ म्हणून आमच्यासारखे अनेक जण भोकाड पसरायची. आमच्या गावातही त्यावेळेस अशीच मगारीगारफ विकणा–यांची एक गँग तयार झाली. मगारीगारफ विकणा–यांची आर्थिक परिस्थिती वाईट असायची. त्यामुळे स्वाभाविकपणे आमचा बाप मला अभ्यासाची धमकी देताना मनात असे, मअभ्यास कर नाहीतर मगारीगारफ विकावं लागेल. त्या धमकीनेसुध्दा आम च्यासारख्यांना आनंद व्हायचा. त्याचं कारण असं की बाळबोध मनात असं वाटायचं की मगारीगारफ विकताना पेटीच आपल्याकडे असते. त्यामुळे आपण किती पण खाऊ शकतो. कधीकधी असं पण वाटायचं की मगारीगारफवाले मगारीगारफ विकताना पेटी त्यांच्याकडेच असते तरीसुद्धा ते कंटाळुस्तर मगारीगारफका खात नसावेत. संध्याकाळ झाली की मगारीगारफवाले मुलं पेटी घेऊन घरी यायचे. त्यावेळी अनेकांच्या पेट्र्यांमध्ये अनेक काड्र्या उरलेल्या असायच्या. मग अशावेळी करायचं काय तर त्यांच्या घरुनच आमंत्रण यायचं. आणि मग आपण ताटली घेऊन जायचं. भाकरीसारखा मगारीगारीफवर ताव मारायचा. ढेकर देऊन रिटर्न यायचं. मग अशा वेळी असं वाटायचं की यांच्या मगारेगारीफ अशाच दररोज घरी यायला पाहिजेत. त्याकाळची परिस्थितीच अशी असल्यामुळे अनेकांना हा धंदा हतबलतेनेही करावा लागत असे. असे अनेक मगारेगारीफवाले आज काळाच्या ओघात लुप्त झाले आहेत.



लेखक – दत्ता पवार

# शैक्षणिक क्षेत्रातील आधुनिक सावित्री: सौ. उषाताई किरण गित्ते

( मा.सौ.उषाताई किरण गित्ते मॅडम यांचा २७ डिसेंबर २०२४ हा जन्मदिवस. त्यानिमित्ताने त्यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकण्यासाठीचा हा शब्द प्रपंच. )

भारतीय संस्कृतीत एकेकाळी स्त्रियांना अत्यंत मानाचे स्थान होते.मध्यंतरी हे महत्त्व कमी केले गेले तीला अनेक बंधनात अडकवण्यात आले.अज्ञानात ठेवण्यात आले.शिक्षणापासून त्या वंचित राहील्या. त्यातुन मुक्त करण्याचे कार्य व अन्य कार्यातुन मुक्त करण्याचे कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले.तोच वारसा पुढे चालवत शैक्षणिक क्षेत्रात काम करणा–या आधुनिक सावित्री म्हणजे मा.उषाताई किरण गित्ते होत.मानवी जीवन हे सर्वश्रेष्ठ मानले जाते कारण माणसाला ईश्वराने अमाप बुध्दीची देणगी दिली आहे.पण त्या मानवाकडे या बुध्दीच्या साहाय्याने विकासाची दृष्टी असली पाहिजे. ज्यांच्याकडे अशी दृष्टी लाभलेली असते त्यांची नावे इतिहासात नोंदवली जातात. मग हा विकास सामाजिक, राजकीय,आर्थिक व शैक्षणिक अशा स्वरूपाचा असू शकतो. हा विकास घडवणारे मग ती स्त्री असो की पुरुष. केवळ दृष्टी असून चालत नाही तर दूरदृष्टी असणे गरजेचे असते. माणसाचा सर्वांगीण विकास हा केवळ शिक्षणामुळेच होऊ शकतो हे अनेक महापुरुषांनी सांगितले यात प्रामुख्याने महात्मा फुले,सावित्रीबाई फुले,राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.याचा अनुभव आपण मागील काही वर्षांपासून समाजात पाहतो आहोत व घेतो आहोत.हाच वसा आणि वारसा डोळ्यासमोर ठेवून अज्ञान अंधकार दूर करून ज्ञानाचा किरण प्रकाशित करण्याचं काम जे काही मोजके लोक करतात त्यात आवर्जून मा. उषाताई किरण गित्ते ताई साहेबांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा डोळ्यासमोर ठेवून त्यांनी शैक्षणिक कार्यरंभ केला. त्यांच्या घरातच मुळात वडील शिक्षक असल्यामुळे शैक्षणिक वातावरण आधीपासूनच होते. त्या शिक्षकाच्या कन्या होत. त्यांचे वडील म्हणजे लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे अत्यंत जवळचे दिनकररावजी मुंडे गुरुजी हे होत. दिनकरराव गुरुजींच्या संस्कारात व पती किरण गित्ते साहेब यांच्या सहवासात असल्यामुळे त्यांनी सर्वाधिक महत्त्व शिक्षणाला दिले आहे.अलीकडे आपण पाहतो की माणसे भौतिक सुविधांच्या मागे लागले आहेत. विशेषता अधिका–यांच्या पत्नी तर भौतिक सुविधा जोडण्यातच अग्रेसर दिसतात. घरात सोफासेट, डिनर सेट,टी सेट असते पण माईड मात्र अपसेट आसते असे चित्र सर्रास आज आपण पाहतो आहोत. ख=या अर्थाने हे अपसेट माईड सेट करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय ते होऊ शकत नाही. त्यासाठी त्यांना चांगले शिक्षण व संस्कार



देणे महत्त्वाचे आहे. हे लक्षात घेऊनच ताईनी परळी शहरात विवेकानंद युथ वेल्फ`अर सोसायटीची स्थापना केली आहे. या माध्यमातून काळाची पावले ओळखून त्यांनी किरण गित्ते खअड अकॅडमी , दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल परळी वैजनाथ , पोद्दार जंबो किड्स सुरू केली इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली आहे.इंग्रजी भाषा हे जगाचे ज्ञान करून घेणारे प्रवेशद्वार आहे. जगाला जाणून घेण्याची महत्त्वाची खिडकी आहे.ती बंद असून चालणार नाही किंवा यापासून अनभिज्ञ राहूनही चालणार नाही.ही बाब लक्षात घेऊन ती उघडण्याचे काम या माध्यमातून त्यांनी केले आहे.खरे तर दिनकरराव गुरुजी व किरण गित्ते साहेबांसारखे सर्वज्ञ त्यांच्या पाठीमागे मार्गदर्शक म्हणून असल्यामुळे ताईना हे काम करणे सोपे गेले.एका आय.ए.एस.च्या पत्नीने भौतिक सुविधांच्या मागे न लागता समाजातील उपेक्षितांच्या शिक्षणासाठी धडपड करणे हे लाखो लोकांतील एक असामान्य असे उदाहरण आहे.परळी या शहराची ओळख राजकीय दृष्टीने अधिक आहे. त्यानंतर तीर्थक्षेत्र, औष्णिक विद्युत केंद्र, रेल्वे स्थानक म्हणून व भागात असलेले कीर्तनकार यामुळे ही परळी चर्चेत असते.शैक्षणिक ओळख परळीला म्हणावी तशी लाभलेली नाही. ही शैक्षणिक ओळख या कार्यातून देण्याचे काम ताईसाहेब करताना दिसतात. आपले पती किती अडचणीतून शिकून अथक प्रयत्न व सातत्यपूर्ण अभ्यास करून जीवनात यशस्वी झाले हे त्यांनी याची देही याची डोळा पाहिले आहे. शिक्षणामुळे एखादं पद प्राप्त केल्यावर माणसाला कशी सर्वार्थाने प्रतिष्ठा मिळते याचा अनुभवही त्यांनी घेतला असल्यामुळे बहुजनांच्या मुलांच्या जीवनात बदल घडवायचा असेल तर त्यांना स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन करणे गरजेचे हे लक्षात घेऊन त्यांनी परळीला स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केले आहे. अलीकडच्या काळात ममी आणि माझेफ अशी प्रवृत्ती बळावत असताना तसेच आपल्यापेक्षा मोठा कोणी होऊ नये जर कोणी झाला तर अस्वस्थ वाटणाच्या या काळात समाजातील अनेक मुले उच्च पदावर जावेत व ती आपल्यापेक्षा मोठी व्हावीत ही भावना ज्या स्त्रीच्या ठिकाणी आहे तिला दुरदृष्टी लाभलेली स्त्रीच म्हणावे लागेल.या स्पर्धा मार्गदर्शन केंद्राचा फायदा घेवुन अनेक जण एम.पी.एस.सी. च्या माध्यमातून यशस्वी होताना दिसत आहेत. त्यांनी स्वतः या स्पर्धा परीक्षा देऊन त्याचा अनुभव घेतला आहे.त्यांनी ठरवले असते तर त्या एखाद्या अधिकारी पदावर जाऊ शकल्या असत्या पण पतीच्या कार्याला खंबीर साथ देणे, अनेक विद्यार्थी घडवणे. हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्या कार्य करताना दिसताहेत. त्यांनी दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलची स्थापना करून एक शैक्षणिक क्रांती घडविली आहे. आज इथे शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.अवघ्या काही वर्षातच या शाळेने नावलौकिक प्राप्त केला आहे. त्याला कुशल नेतृत्व देण्याचे काम ताईसाहेब करताहेत. या शाळेचे उद्घाटनच मुळात त्यांनी शिक्षण क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे कार्य करणा–या डी. वाय.पाटील यांच्या हस्ते करून एका अर्थाने यशाकडे जाण्याचे पहिले पाऊल उचलले गेले होते. या शाळेतील नियोजन,अभ्यासू शिक्षक, त्यापेक्षा त्यांच्याकडे असलेली नम्रता, विविध नीतीमुल्य रुजवण्यासाठी शाळेत घेण्यात येणारे अनेक उपक्रम. हे वाखणण्याजोगे आहे.

कुठल्याही यशस्वी पुरुषाच्या यशात एका स्त्रीचे महत्त्वाचे योगदान असते.मग ती स्त्री पत्नी,आई अथवा बहीण या अन्य कोणत्याही नात्याची असो.खरे तर माणसाच्या जीवनाला आकार देण्यात आई इतकेच महत्त्वाचे स्थान पत्नीचे असते. किरण गित्ते साहेब त्रिपुरा राज्याचे सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, उद्योग पर्यटन विभाग सचिव म्हणून आज काम करताहेत या पुर्वी ही त्यांनी वेळोवेळी अन्य जिल्हाधिकारी अमरावती, पुणे महानगर आयुक्त पदावर उत्कृष्टपणे कार्य केले आहे. त्यात ताईचा सिंहाचा वाटा आहे. अशा शिक्षणावरती अफाट प्रेम करणा–या, आपल्या पतीला यशस्वीतेकडे घेऊन जाणा–या, आपल्या पित्याचा नावलौकिक वाढवणा–या,परळीत शैक्षणिक क्रांती करू पाहणा–या आधुनिक सावित्री म्हणजे उषाताई यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्त त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो. ईश्वर त्यांचे आयू आरोग्य अबाधित राखो व त्यांच्या कडून भविष्यात ही असेच कार्य घडत राहो.असी ईश्वरचरणी प्रार्थना करून माझा शब्द प्रपंच थांबवतो.

**प्रा.डॉ. रामकृष्ण बदने ग्रामीण महाविद्यालय,वसंतनगर,**
**ता.मुखेड जि.नांदेड**
**भ्रमणध्वनी -९४२३४३७२१५**

# वाचनामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो– प्रा.दिलीप अहिरे



नाशिक (प्रतिनिधी)वाचन हा माणसाच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. वाचनामुळे ज्ञान, विचारशक्ती, संवेदनशीलता आणि व्यक्तिमत्त्व विकास घडतो असे प्रतिपादन पीव्हीजी बी.एड. महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. दिलीप अहिरे यांनी केले. वाचन ही केवळ करमणूक नसून ती बौद्धिक, सामाजिक, भावनिक आणि मानसिक प्रगतीसाठी आवश्यक आहे असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमाच्या अंतर्गत महाविद्यालयात प्राचार्य डॉक्टर सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भरविण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाच्या वेळी प्रा. अहिरे बोलत होते यावेळी मराठी विभागाच्या प्रमुख प्रा. मनीषा पाटील यांनी वाचनाचे महत्व सांगितले.वाचनामुळे नवीन विषयांबद्दल माहिती मिळते. इतिहास, विज्ञान, कला, तंत्रज्ञान अशा विविध विषयांवरील पुस्तके माणसाला ज्ञानी बनवतात. विचारशक्तीचा विकास वाचनामुळे माणसाचे विचार प्रगल्भ होतात. तो समस्या सोडवण्याच्या आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अधिक सक्षम होतो.भाषा सुधारणा वाचनाने शब्दसंग्रह वाढतो, व्याकरण सुधारते, आणि लिखाणकौशल्य विकसित होते असेही सांगितले. छात्र अध्यापिका नेहा महाजन हिने महान व्यक्तींच्या आत्मचरित्रे वाचून प्रेरणा मिळते. संघर्षातून उभारी कशी घेतली जाते, हे समजते असे सांगितले तर प्रा.अरविंद जिंजर यांनी मनःशांती आणि मनोरंजन वाचन मन शांत करते. साहित्य, काव्य, कथा वाचून तणाव कमी होतो आणि करमणूकही होते. कथा–कादंबऱ्या वाचल्याने इतरांच्या भावना आणि अनुभव समजण्याची क्षमता विकसित होते, जी संवेदनशीलता वाढवते असे सांगितले. यावेळी प्रा.अनिता बोडके म्हणाल्या,वाचनामुळे व्यक्ती जीवनभर शिकण्याची सवय लावते. हे सतत प्रगती साधण्यासाठी उपयुक्त ठरते असे सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय पाखले यांनी केले तर वैभव जाधव यांनी आभार मानले.

# आजच्या शैक्षणिक संस्था म्हणजे निव्वळ बांडगुळे

खिरापती असल्यागत या राजकीय पुढ–यांनी स्वतःची आणि पुढील सात पिढ्या पुरतील एवढी धनसंपती साठवीण्यासाठी केलेली खटाटोप म्हणजेच आजच्या शैक्षणिक संस्था. बहुतांश पुढ–यांनी हेच केले आपली सत्ता असेपर्यंत शैक्षणिक संस्था मंजूर करून घेतल्या आणि त्या शैक्षणिक संस्थेचा बाजार असल्या सारखी अवस्था केली. लाखो च्या घरात डोनेशन, फिस पालक भरतात आणि या संस्थेला पैसा देतात

संस्थेचे अजून एक वैशिष्ट्य कि ज्या लोकांना या संस्थे मध्ये नोकरी करायची असेल तर लाखोनिशी पैसे मागतात पैसे देऊन या लोकांना पगार हि कमी. अर्ध आयुष्य तर हे भरलेले पैसे मिळवण्यात गेले. या संस्थेचे पोट इथे सुद्धा भरते कि नाही हाच प्रश्न आहे.

डीएड, बिएड करून या संस्थेला पैसे देऊ करणारे खूप आहेत म्हणून या संस्था आता शेफारल्यात. पण काहींची आयुष्य उध्वस्त हि झाली. संस्था आणि पैसा हे समीकरण च वेगळं आहे.

या संस्थेची वार्षिक उलाढाल किती तरी कोट्यावधीत होते तेही फक्त आणि फक्त या पालकांच्या जीवावर. पालक पैसे भरतात म्हणून या संस्था टिकून आहेत. या संस्था पैसे खाऊन खाऊन मगरी सारख्या झाल्यात गल्ले

लठ.या संस्थेला मोठे करण्याचे काम हे पैसे भरणारे लोक करतात. काही दिवसानं पूर्वी हि आणि आताही एक एका लोकांची नोकरी साठी भरमसाठ पैसे घेतले जातात. या शैक्षणिक संस्थातची काडीची ची पात्रता शिक्षण सेवा द्याची पण हे राजकीय लोक लुडबुड करून आपलीच पोळी भाजून खातात.पण एखाद्या संस्थेचे लेबल लावून घेतले म्हणजे जबाबदारी संपली



रुपाली देशपांडे
मो.८८८८९५५५३९

हि पालकांची भावना.

मागील काही वर्षातच खूप शाळा निघाल्या. कॉलेज निघाले तसेच पदवीत्तोर सर्व क्षेत्रातील मोठं मोठी कॉलेज निघाली. त्यातल्या त्यात मेडिकल आणि इंजिनियर कॉलेज जास्त निघाली या कॉलेज मध्ये पालकांनी अक्षरशः तुफान पैसा ओताला. या संस्थेत मुलांचे मेडिकल पूर्ण होण्यासाठी. ज्या मुलांची बौधिक पात्रता नसली तरी पैश्याच्या जोरावर हि मुले डॉक्टर झाली आणि अवैध्य मार्गाने लोकांना लुटू लागली. हो खरंच हि एक प्रकरची लूटच आहे. फिस वाढवणे ऑपरेशन करून लोकांन कडून पैसा घेणे. इजिनियर ची पण तीच अवस्था सर्व क्षेत्र अशीच लुटारू पद्धतीची सुरु झाली.

बर या संस्थावाले लोक दर चार पाच वर्षात कोणत्या तरी एका फिल्ड ला स्वतःच महत्व देतात समाजात जरा जाहिरात करून

हे किती फायद्याचे आहे सांगतात. मी काही उदाहरण देते काही वर्षांपूर्वी डीएड चे महत्व पेरले त्यावेळेस हजारो मुला मुलींनी डीएड – बीएड केली,

ज्या मुलांचे डीएड–बिएड झालेले आहेत त्याना विचारा कि सुरवातीच्या काळत हि मुले पटापट नोकरी लागली. पण नंतर यांना कोणीही विचारले नाही. आज हि हि मुले कोणतीही काही छोटी मोठी नोकरी करतात, काहीजन रिक्षा चालवतात तर काही अनेक विविध जॉब किंवा धंदा पाणी करून डिग्रीला धूळ खाऊ घालतात.नंतर ची लाट आली डॉक्टर, इंजिनियर, यानंतर एमबीए तर हि मुले रद्दी पेपर सारखी झाली कोणाला विचारलं काय शिक्षण झालं तर सगळी कडे तेच उत्तर. आताची लाट म्हणजे सीए गलोगल्ली सीए ची ऑफिस. पुढची लाट माहित नाही. पण थांबल पाहिजे सर्व काही हे आता परत च्या या एक एक शैक्षणिक लाटेत या संस्थानी किती कमवले असतील याचा अंदाज सुद्धा घेऊ शकत नाही आपण. पालकांनो खरंच जागे व्हा आपल्या मुलांच्या बैधिक कुवती नुसार शिक्षण दया, त्याच्या आवडी निवडी नुसार त्याला शिकवा. या बाजारात त्याला बैला सारखं मांडू नका. या संस्थेला मोठे करण्याचे काम संपले आता. कोठेतरी विचार करा.

शाळे पासून कॉलेज पर्यंत या सर्व बडेजाव संस्थान मध्ये मुले असली तरीहि मग तुम्हला परत क्लास लावण्याची काय गरज आहे. तुम्ही एवढा पैसा जर शाळा/ कॉलेज मध्ये भरला असेल. लाखाणीशी देऊन जर त्या शिक्षणाला काही दर्जाच नाहीतर मग या अश्या शाळा /कॉलेजात मुलांना पाठवता कशाला?

याचा शैक्षणिक दर्जाच नाही तर एवढे लाख भरून मुलांना परत क्लास लावण्याची गरज असेल तर झोपेतून जागे व्हा.थोडे तरी भानावर या बस करा हा बाजार. हे संस्थाना मोठे करायच्या नादात मुलं कधी मोठी होतात कळतं नाही. म्हणून जागरूक पालक व्हा.

उर्वरित भाग पुढील भागात, पुढील भाग हा शेवटचा भाग असेल.

संपर्क – रुपाली देशपांडे
८८८८९५५५३९

# ना. पंकजाताई मुंडे यांचे पाच वर्षानंतर मंत्रालयात आगमन



पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे आज मंत्रालयातील त्यांच्या दालनात पाच वर्षानंतर आगमन झाले. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे ठरलेले सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आल्याने अत्यंत साधेपणाने मंत्री श्रीमती मुंडे यांनी मंत्रालयातील त्यांच्या दालनात पदभार स्वीकारून कामकाजाची सुरुवात केली. यावेळी मंत्री श्रीमती मुंडे यांनी प्रथम गणेशाची पुजा करून स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन केले. यावेळी

# कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या बीसीए विद्यार्थ्यांचे प्रहसन सादरीकरण



डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर येथे २५ डिसेंबर पासून केंद्रीय युवक महोत्सव २०२४ २५ ला शोभायात्रेने सकाळी नऊ वाजता महोत्सवात सुरुवात झाली या महोत्सवात कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या बीसीएच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे या विद्यार्थ्यांनी प्रहसन कला प्रकार सादर केला आहे या प्रहसनाला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली हे प्रहसन म्हणजे समाजाचा आरसा आहे विद्यार्थ्यांना योग्य आधार आणि विश्वास दिला तर ते अधिक आत्मविश्वासाने यश मिळवू शकतात या प्रहसनात अथर्व जवणे कृष्णा दिगे प्रथमेश जवने संकेत वामन धनश्री गर्जे कांचन गाडे आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता छत्रपती संभाजीनगर विधानसभा निवडणुकात गाजलेल्या लाडकी बहिणी योजना मआणि म एक हे तो सेफ है याचा प्रभाव विद्यापीठाच्या केंद्रीय युवा महोत्सवातही दिसला विद्यापीठाच्या वतीने आयोजित चार दिवसीय केंद्रीय युवा महोत्सवास बुधवारपासून सुरुवात झाली सकाळी नऊ वाजता विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यापासून शोभायात्रेला सुरुवात झाली याचे उद्घाटन मनपा आयुक्त जी श्रीकांत यांच्या हस्ते झाले मराठवाड्यातील महाविद्यालयांनी विविध कला सादर करून रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन केले तसेच प्रबोधनही केले हा युवा महोत्सव २५ डिसेंबर ते २८ डिसेंबर पर्यंत सुरू आह

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलचे ६ वे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

परळी ( प्रतिनिधी) दिल्ली वर्ड पब्लिक स्कूलचे सहावे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल प्रणांगणाम ध्ये दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न झाले. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या गीतावर नृत्य सादर करून आगळे वेगळे कलाविष्कार सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीतामुळे प्रेक्षक अक्षरक्षा भारावुन गेले होते.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन शाळेचे मार्गदर्शक श्री. किरण गित्ते साहेब, खअड, सचिव त्रिपुरा सरकार आणि विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ. उषाताई किरण गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली चि. शौर्य किरण गित्ते यांनी केले. उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर साहेब, झमी होनार सुपरस्टारफ नृत्य कोरिओग्राफर साक्षी मेथे, मुख्याध्यापक डॉ. श्रीकांत पाटील सर, पोतदार जमबो किड्सच्या मुख्याध्यापिका सौ. स्नेहा गित्ते आदी मान्यवरांच्या उपस्थितीत दिप प्रज्वलन करण्यात आले.

. यावेळी श्री.शौर्य किरण गित्ते, उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. पोतदार जमबो किड्स विद्यार्थी



विद्यार्थीनींनी व दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर नृत्य सादर केले.

शाळेतील चौथी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. पोतदार जमबो किड्सच्या विद्यार्थी- विद्यार्थीनी भुलभुलया, आज है संडे, रिटरो, ना ना ना रे तोबा तोबा, पुष्पा २, गाण्यावर नृत्य सादर केले. दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी हनुमान चालीसा वर आधारित गाण्याने सुरुवात केली. कोळीगीत, याच बरोबर पाचवीच्या विद्यार्थ्यांनी दिंडीचे सादरीकरण केले. साक्षी मेथे यांनी सामी सामी, कमली,मदन, मंजिरी, कुरूची मर्दा बीटी या हिंदी व मराठी गाण्यांच्या मेषप वर नृत्य सादर केले व प्रेक्षकांची दाद मिळवली. छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज आधारित, भक्तिगित, लोकगित, हिन्दी गीत , आदिवासी गीत , पारंपारिक वेशभूषा नृत्य आविष्कार सादर केला. स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलचे तसेच पोतदार जमबो किड्स शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थी - विद्यार्थीनी पालक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राम अशोक धुमाळ सीए ची परीक्षा उत्तीर्ण



आष्टी । द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया मार्फत घेण्यात येणाऱ्या सनदी लेखापाल अर्थात सीए या परीक्षेचा निकाल नुकताच घोषित करण्यात आलेला असून यामध्ये जळगाव तालुका आष्टी येथे राम अशोक धुमाळ हा विद्यार्थी उत्तीर्ण झाला आहे. राम अशोक धुमाळ या विद्यार्थ्याने बी कॉम ची परीक्षा सिंहगड इन्स्टिट्यूट,पुणे येथून उत्तीर्ण केलेली असून एम कॉम आनंदराव धोंडे महाविद्यालय,कडा येथून पूर्ण केलेले आहे. सध्या तो स्वतंत्र सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय,बीड येथे अंतिम वर्षामध्ये कायद्याचे शिक्षण घेत आहे. राम धुमाळ हा २०१८ पासून पुणे येथे भाऊ लक्ष्मण सोबत राहून सीए ची तयारी करत असून या परीक्षेतील सर्व टप्पे त्याने यशस्वीरित्या उत्तीर्ण केलेले आहेत.नुकत्याच घोषित झालेल्या अंतिम निकालात त्याने हे यश संपादन केले आहे.अत्यंत सामान्य शेतकरी कुटुंबातून त्यांनी हे यश मिळवलेले आहे.त्याच्या या यशाबद्दल आमदार सुरेश आण्णा धस,आष्टी दूध संघाचे चेअरमन शांतिनाथ भोसले,पोपट धुमाळ.भरत जाधव,संचालक अशोक पवार,माजी सरपंच राम धुमाळ,माजी सरपंच मधुकर गिर्हे,अशोक वाळके,कवी हरीश हातवटे यांच्यासह ग्रामस्थ व नातेवाईकांनी त्याचे अभिनंदन केले आहे

# गेवराईत कृषी प्रदर्शनाची उत्सुकता शिगेला ; डोम उभारणीच्या कामाचा शुभारंभ

## सहा किलोचा कोंबडा अन चीनचा बोकड ठरणार आकर्षण

गेवराई : किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्व. कृषिरत्न गणेशराव बेदरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दि.०३ ते ०७ जानेवारी दरम्यान ५ दिवशीय भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे गेवराईच्या दसरा मैदानावर आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान शुक्रवार दि.२७ डिसेंबर रोजी दसरा मैदानावर कृषी प्रदर्शनाच्या डोम स्ट्रक्चरच्या कामाचा म ान्यवरांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.



यावेळी गेवराई ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर, पोलीस उपनिरीक्षक संतोष जंजाळ, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भुतेकर, पत्रकार मधुकर तौर, पत्रकार विनोद नरसाळे, भाऊसाहेब शिंदे, शिनुभाऊ बेदरे, राजेंद्र मोटे, पत्रकार जुनेद बागवान, सरपंच भागवत जाधव, पत्रकार विनोद पौळ, मुस्ताक राज, संभाजी जाधव सह आदी मान्यवर उपस्थित होते. भव्य असे सहा डोम या ठिकाणी उभारण्यात येत असून या अनुषंगाने भव्य कृषी प्रदर्शनात विविध कार्यक्रमाची रेलचेल असणार असून या प्रदर्शनाची सध्या जय्यत तयारी सुरु असून शेतक-यांमध्ये कृषी प्रदर्शनाची उत्सुकता शिंगेला पोहोचली आहे. तर दि.०३ जानेवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे असल्याची माहिती कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक कृषिभूषण महेश बेदरे, प्रसिद्धी प्रमुख भागवत जाधव, विनोद पौळ यांनी दिली आहे.

***सहा किलोचा कोंबडा, चीनचा बोकड ठरणार प्रदर्शनाचे आकर्षण**

जिल्ह्यातील पशुपालकांना पशुधन सांभाळताना वाव मिळावा दृष्किोनातून यंदाच्या कृषी प्रदर्शनात बुटकी म्हैस, सहा किलो वजनाचा राजा कोंबडा, व चायनाचा बोकड पाहण्याची उत्सुकता शेतक-यांना लागली आहे.

**शेतक-यांना दिला जाणार मोफत स्टॉल**

गेवराई येथील कृषी प्रदर्शनामध्ये शेतक-यांनी केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी मोफत स्टॉल दिला जाणार असून स्वतः उत्पादित केलेल्या नाविन्यपूर्ण उद्योगाला मोफत स्टॉल दिला जाणार आहे जेणेकरून या आपल्या लघु उद्योगास चालना मिळावी या दृष्किोनातून शेतक-यांना मोफत स्टॉल दिला जाणार आहे

# किरकोळ बाजारात कांदा दर ५० रुपयांहून २५ रुपये किलोवर घसरले

## ढगाळ वातावरणामुळे कांदा काढणीचीधांदल; साठवणुकीवरच शेतकऱ्यांचा भर

हवामान खात्याने वर्तवलेल्या पावसाच्या अंदाजामुळे कांदा काढणीसाठी पाचोड (ता.पैठण) परिसरातील शेतकऱ्यांची चांगलीच घांदल उडाली आहे. परिसरात गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वाता-वरणामुळे कांदा काढणीने वेग आला आहे. बाजारात कांद्याची आवक वाढली असून कांद्याचे भावही उतरले आ-हेत. या वर्षी खरीप हंगामातील काही पिकांनी शेतकऱ्यांना दगा दिला. त्यामुळे शेतकऱ्यांची सर्व मदार कांदा पिकावर होती. यंदा तालुक्यातील शेतकऱ्यांनी पारंपरिक कापूस, तूर, सोयाबीन या पिकांना फाटा देऊन कांद्याची ला-गवड केली आहे. या वर्षी कांद्याला सुरुवातीला चांगला भाव मिळाला, परंतु शेतकऱ्यांचा कांदा काढणीसाठी येताच कांद्याचे भाव कोसळले आहेत. चांगला भाव आहे या आशेवर शे-तकऱ्यांनी कांदा पिकावर जास्त खर्चही केला. परंतु अचानक कांद्याचे भाव पडले असल्याने शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. त्यामुळे बाजारपेठेमध्ये कांद्याला समाधानकारक बाजारभाव मिळत नसल्याने कांदा उत्पादक शे-तकऱ्यांनी कांदा साठवणुकीवर भर दिला आहे. परिणामी मकांदा काढणी जोमात, मात्र बाजारभाव कोमातफ अशी काहीशी स्थिती आहे. पाचोडसह आडूळ, बीडकीन परिसरात काढणीला वेग पाचोड सहपरिसरात ढगाळ वातावरणामुळे कांदा काढणीसाठी लगबग सुरू झाल्याचे चित्र परिसरात पाहायला मिळत आहे. छायाः शेख इरफान, पाचोड कांद्याचे दर घसर-ले पैठण तालुक्यातील पाचोड, आडूळ, कडेठाण, ढोरकीन, बिडकीन, विहामांडवा परिसरात कांद्याचे उत्पादन घेतले जाऊ लागले आहे. सद्यःस्थितीत कांद्याला २० रुपयांपेक्षाही कमी बाजारभाव मिळत आहे. नीचांकी बाजारभावामुळे कांदा उत्पादक शेतकरीसंकटातआहे. कांद्याचे हमी भाव जाहीर करा केंद्र शासनाने नव्याने कांदा उत्पादन किती झाले याची माहिती करून घेऊन कांदा आयात-निर्यात धोरण ठरव-ावे, जेणेकरून समाधानकारक भाव मिळेल किंवा सरकारने ओल्या कांद्याला २५ रुपये, साठवणूक केलेल्या कांद्याला ५० रुपये हमीभाव जाहीर करावा, अशी मागणी आह

# पैठण तालुक्यात आकडेबहाद्दरांचे मखेळ होणार बंद !

## वीज चोरी रोखण्यासाठी तारा काढून टाकले केबल

पाचोड । वीज वाहिन्यांवर आकडे टाकून होणारी चोरी रोखण्यासाठी दावरवाडी (ता. पैठण) उपकेंद्राअंतर्गत चार गावांतील वीज खांबांवरील उघड्या वाहिन्या काढून त्याऐवजी बंच केबल टाकल्याने आकडेबहाद्दरांना चाप बसणार आहे. वीज ग्राहक कमी व आकडेबहाद्दरांची संख्या अधिक झाल्याने मोठ्या प्रमाणात रोहित्र खाक होऊन नियमित वीज ग्राहकांवर अंधारात राहण्याची नामुष्की ओढवली होती. वीज वितरण कंपनीने यावर पर्याय म्हणून या उपकेंद्राअंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये महावितरणने बंच केबल टाकण्याचे काम हाती घेतले. सर्वप्रथम दावरवाडी ३३ केव्ही उपकेंद्रा अंतर्गत सालवडगाव, कुतुबखेडा, वडजी व थेरगाव येथून कामास प्रारंभ करण्यात आला. दादेगाव येथेही केबल टाकण्याचे काम प्रगतिपथावर आहे. सालवडगाव, वडजी, कुतुबखेडा व थेरगाव येथे केबल टाकून त्यावर कोटेशन भरलेल्या ग्राहकांचेच कनेक्शन जोडण्यात येत आहे. त्यामुळे विजेची गळती व वीज चोरी बंद झाली असून पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या या केबल टाकण्याच्या कामामुळे जोडणी घेण्यासाठी अनेकांच्या महावितरणकडे रांगा लागल्या आहेत. या प्रयोगामुळे वीज चोरीची गंभीर समस्या निकाली निघाल्याचा दावा वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आलाू आहे. परिसरात केबल टाकण्याचे काम सुरू असल्याने पंधरा दिवसांपासून वीजपुरवठा सातत्याने बंद राहत आहे.दादेगाव खुर्दनंतर हर्षी खुर्द, हर्षी बु. व दादेगाव बु. येथे केबल टाकण्यास सुरवात होणार आहे.प्रत्येक खांबावर अधिकृत ग्राहकांना जोडणी देण्यासाठी स्वतंत्र बॉक्सची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे आकडे टाकून वीज घेणे बंद झाले आहे. आकडे टाकण्यासाठी पर्याय नसल्याने नवीन जोडणी घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ होऊन महावितरणच्या उत्पन्नातही भर पडणार आहे.या गावांत केबल टाकण्यासाठी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता अशोक घुले, पाचोड व दावरवाडीचे सहायक कार्यकारी अभियंता ओमप्रकाश काळे, एनसीसी कंपनीचे अभियंता प्रकाश निंभोरे, वरिष्ठ तंत्रज्ञ गोपाळ लुचारे, गणेश आगळे, कैलास नेमाने, गणेश गवते, कपिल राठोड, संतोष भवरे, सोमनाथ औटे पाचोड दावरवाडी परिसरातील गावांमध्ये वीज वाहिन्या काढून केबल टाकताना कर्मचारी. (छायाचित्र : हबीबखान पठाण) आदी परिश्रम घेत आहेत. याबाबत उपकार्यकारी अभियंता अशोक घुले म्हणाले, की कुतुबखेडा, वडजी, सालवडगाव व थेरगाव या चार गावांमध्ये केबल टाकण्याच्या स्मार्ट डिजिटल मीटर बसविणार वीज चोरी रोखण्यासाठी खांबावरील उघड्या ॲल्युमिनियमच्या तारा काढून केबल टाकण्यात येत आहे. यानंतर महावितरणकडून तातडीने स्मार्ट डिजिटल मीटर बसविण्यात येणार असून फेब्रुवारीपासून प्रीपेड सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तूर्तास स्मार्ट डिजिटल मीटर बसविण्यास बिडकीनपासून सुरवात झाली आहे.प्रयोगाला यश आले असून वीज चोरीला आळा बसणार आहे. थकबाकीची वसुली व नवीन ग्राहक संख्या वाढल्याने तालुकाभर हा प्रयोग राबविण्यात येणार आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २९ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## आरोपींना फाशीच झाली पाहिजे फक्त राजकारण करु नका-ना.मुंडे



मुंबई (प्रतिनिधी): बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील तरुण सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना कडक शासन व्हावे, त्यांना फाशीची शिक्षा व्हावी अशी माझी पहिल्या दिवशीपासून ठाम भूमिका होती आणि आजही तीच कायम आहे. या प्रकरणी आरोपींना कोणाच्याही कितीही जवळचा असला तरी तातडीने शासन व्हावे यासाठी आणि न्यायालयीन दिरंगाई होऊ नये म्हणून फास्टट्रॅक कोर्टात हे प्रकरण चालावे यासाठी बारा डिसेंबरला सर्वात आधी मुख्यमंत्र्यांकडे लेखी मागणी मी केलेली आहे, असे मत अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा ही सर्वांचीच भूमिका आहे. मात्र या घटनेच्या आडून जे राजकारण केले जात आहे, ते दुर्दैवी आहे, तसे हे राजकारण करू नये असे कळकळीचे आवाहनही धनंजय मुंडे यांनी केले आहे.स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येची घडलेली घटना निर्घृण आणि तितकीच चीड आणणारी होती. यासारख्या घटना जिल्ह्यातच काय तर महाराष्ट्रात कुठेही होऊ नयेत यासाठी अशा गुन्हेगारी प्रवृत्ती ठेचून काढणे आवश्यक आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी योग्य ती पाऊले उचलली असल्याचे ते म्हणाले

# बीड संतोष देशमुख हत्या प्रकरणी देवेंद्र फडणवीसांचे महत्त्वाचे आदेश,

## बंदुकीसोबत फोटो काढणा-यांवर मोठी कारवाई

**बीड,/प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. याप्रकरणी राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. या घटनेचा सर्वच स्तरावरुन निषेध व्यक्त करण्यात येत आहे. बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी काल सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. यावेळी काळे कपडे घालून, काळ्या फिती लावत हजारो लोक मोर्चात सहभागी झाले. ङ्गवाल्मिकी कराडला अटक करा. धनंजय मुंडे राजीनामा द्या, अशी प्रमुख मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आली. त्यातच आता याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी महत्त्वाचे आदेश दिले आहेत. फरार आरोपींची संपत्ती जप्त करा बीड संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करा,



असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. या प्रकरणातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया तातडीनं सुरु करा, तसेच बंदुकीसोबत ज्या कोणाचे फोटो आहेत, त्यांचे परवाने रद्द करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. कडक कारवाईला सुरुवात बीडमधील संतोष देशमुख हत्याप्रकरणाची चौकशी सीआयडीकडून करण्यात येत आहे. आता याप्रकरणी कडक कारवाईला सुरुवात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर बीडमधील अनेक तरुणांचे बंदूक हातात घेताना, बंदुकीतून गोळ्या झाडतानाचे फोटो व्हायरल होत आहेत. यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी सातत्याने केली जात होती. अखेर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सीआयडीचे अतिरिक्त महासंचालक प्रशांत बुरडे यांना दोन महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. देवेंद्र फडणवीसांचे आदेश काय? बीड जिल्ह्यातील काही नेत्यांचे बंदुकीतून गोळी झाडत असल्याचे फोटो आणि व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. बंदुकीसह ज्यांचे- ज्यांचे फोटो आहेत, ते जर खरे असतील तर त्या सर्वांचे परवाने रद्द करा. ही प्रक्रिया तातडीने सुरू करा. तसेच आतापर्यंत ज्या बंदुकीचे परवाने दिले आहेत, त्यांचा तातडीने फेरआढावा घ्या, असे निर्देश देवेंद्र फडणवीसांनी दिले आहेत.

### तोपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा

दरम्यान संतोष देशमुख यांची हत्या होऊन आता १९ दिवस उलटून गेले आहेत. मात्र अजूनही सर्व आरोपींना अटक झालेली नाही. त्यामुळे वातावरण चांगलंच तापलं आहे. त्यातच बीडमध्ये संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील आरोपीला अटक करण्यात यावी या मागणीसाठी सर्वपक्षीय नेत्यांकडून आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये सर्वपक्षीय नेते सहभागी झाले होते. या मोर्चामध्ये बोलताना नेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली. वाल्मिकी कराड यांना अटक करावी, जोपर्यंत या प्रकरणात संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळत नाही तोपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# देशमुख परिवारासाठी धारूरकरांनी मदत फेरी ३ लाख १३ हजार रुपये केले जमा

किल्ले धारूर (प्रतिनिधी): धारूर येथे केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी अपहरण करून खून करण्यात आला होता ही घटना म्हणजे समाजातील काळीमा फासणारी घटना होती. देशमुख हे सतत गरजू नागरिकांच्या मदतीला धावून जात होते अशा आदर्श सरपंचांची हत्या केल्याने महाराष्ट्र मध्ये या हत्येचा निषेध करून आरोपींना शिक्षा व्हावी यासाठी आंदोलन मोर्चे निघाले. या परिवाराला मदत मिळावी म्हणून धारूर येथे २७ डिसेंबर रोजी सर्वपक्षीय सर्व समाजातील नागरिकांनी मदत फेरी काढून तीन लाख १३ हजार रुपये जमा करण्यात आले. या मदत फेरीमध्ये मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. केज तालुक्यातील मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या हत्या करणारे आणखी तीन आरोपी फरार असून ते पोलिसांना मिळाले नाहीत यासाठी नागरिकांनी रस्ता रोको ,जिल्हा बंद असे अनेक आंदोलने करून प्रशासनाचा निषेध करण्यात आला. देशमुख यांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये अनेक गावातील प्रश्न मार्गी लावले आहेत. गावातील लहान-मोठे कामे तसेच नागरिकांच्या लहान-मोठ्या अडचणी सोडवण्यासाठी तत्पर असायचे अशा आदर्श सरपंच यांचा अपहरण करून खून होतो व आरोपी अद्याप अटक होत नाहीत ही गंभीर बाब आहे. आशा घटनेचा सर्व स्तरातून निषेध होत आहे. २७ डिसेंबर शुक्रवार रोजी धारूर शहरातून सर्व समाज बांधव सर्व पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते सह पत्रकार बांधव यांनी एकत्र येत स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या परिवारासाठी मदत फेरी काढण्यात आली. या मदत फेरीतून ३ लाख १३ हजार रुपये जमा करण्यात आले तसेच ग्रामीण भागातूनही रक्कम जमा करण्याचे काम चालू आहे. माजलगाव मतदार संघाचे आ प्रकाश सोळुंके यांनी या कुटुंबाला आर्थिक मदत म्हणून दहा लाख रुपये जाहीर करत सर्व पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते सर्व समाज बांधव यांनी एकत्र येत माजलगाव येथे मदत फेरी काढून रक्कम जमा केलेली आहे. तसेच धारूर व वडवणी येथे मदत फेरी काढण्यासाठी सर्वपक्षीय बैठक घेऊन आव्हान केले होते. माजलगाव वडवणी धारूर अशी तीन तालुक्याची मदत फेरीतून मिळालेली रक्कम मालगाव मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी तसेच विविध पक्षाचे पदाधिकारी समाज बांधव हे ४ जानेवारी रोजी स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या परिवाराला जमा केली मदत देणार आह

## लोहा तालुक्यात अवैधरित्या वाहतूक वाळूबंद, माती सुरू



लोहा (शुभम उत्तरवार) लोहा तालुक्यतिल भारसवाडा येथून माती माफियांकडून लाखों रुपयाची माती चोरी, प्रशासनाचं मात्र दुर्लक्ष तालुक्यात राजरोसपणे माती उत्खनन सुरू आहे. तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी शासनाच्या नियमाप्रमाणे कुंभार समाजातील एका व्यक्तीच्या नावाने ५०० ब्रास माती नेण्याची परवानगी दिली त्यामध्ये बारा हयवा गाड्यांचा नोंद करण्यात आली आसुन मात्र शासनाने दिलेल्या नियमाची पायमल्ली करत एकीकडे जिल्ह्यात अवैध व्यवसायाला आळा घालण्यासाठी प्रशासन अलर्ट मोडवर असताना सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अवैध व्यवसाय तेजी मध्ये सुरू आहे. तालुक्यातील भारसवाडा येथून गोदावरी पात्रांमध्ये मोठ्या प्रमाणात मातीचा उपसा केला जात आहे. या मातीचा उपयोग वीटभट्ट्यासाठी केला जातो. विशेष म्हणजे जेसीबी, पोकलेन, डम्पर, ट्रॅक्टर थेट गोदावरी पात्रात उतरवून दररोज १५० ते २०० पेक्षा जास्त डम्पर भरून माती चोरली जात आहे. महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. त्यामुळे प्रशासन व भूमाफिया यांच्यात संगनमत असल्याचा चित्र माती उत्खनातून दिसत आहे.सध्या थंडीचे हंगाम सुरू असून महसूल, पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी कर्मचारी गाढ झोपेत असताना लोहा तालुक्यातील भारसवाडा परिसरातून केवळ दिवसाच नव्हे तर रात्रीच्या वेळी देखील माती उत्खनन करण्याच्या प्रकारांचे पेव फुटले आहे. येथील नदीपात्रात अनेक ठिकाण कंत्राटदाररुपी घुशी लागल्याचे चित्र दिसत आसुन महसूल विभागातीलमंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्या कार्यक्षेत्रात त्यांच्या नाका खाली हे भूमाफिया माती उत्खनन करीत आहे.याची माहिती देखली या अधिकाऱ्यांना नाही.प्रशासनाकडून कारवाईचा अंकुश नसल्याने मातीचोरांचे फावत असल्याचे परिसरात नागरिकांचे म्हणणे आहे

## आ.सुरेश धस यांनी माझी माफी मागावी प्राजक्ता माळी



मुंबई (वृत्तसंस्था): अभिनेत्री प्राजक्ता माळी पण परळीला येते. कोणाला नवा चित्रपट काढायचा असल्यास त्यांच्यासाठी हा जवळचा पत्ता आहे, असे शब्द भाजपचे आमदार सुरेश धस यांनी काल वापरले. मंत्री धनंजय मुंडेंवर टीका करताना धस यांनी प्राजक्ता माळी, रश्मिका मंधाना यांची नावं घेतली. त्यानंतर आज प्राजक्ता माळीनं पत्रकार परिषद घेत धस यांच्या विधानाचा निषेध केला. तुमचं राजकारण तुम्हाला लखलाभ. पण त्यासाठी आम्हाला बदनाम का करता? तिकडे पुरुष कलाकारदेखील होते. मग नावं केवळ महिला कलाकारांचीच का घेतली जातात? असे प्रश्न प्राजक्तानं विचारले.फआमदार सुरेश धस यांनी माझ्याबद्दल अतिशय कुत्सितपणे विधान केलं. समोर हशा पिकावा यासाठी त्यांनी माझ्या नावाचा वापर केला. ते कोणत्या हेतूनं माझ्याबद्दल बोलले ते न कळायला मी आणि महाराष्ट्राची जनता दूधखुळी नाही. सुरेश धस यांनी माझी माफी मागावी. त्यांची तक्रार मी महिला आयोगाकडे केलेली आहे. त्यांनी माफी न मागितल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही केली जाईल. मी आज किंवा उद्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना या प्रकरणी निवेदन देणार आहे,फ असं प्राजक्तानं सांगितलं

## आडस येथील कला महाविद्यालयास नॅक मूल्यांकन बी ग्रेड प्राप्त

केज(प्रतिनिधी)तालुक्यातील आडस येथील कला महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन झाले.तपासणीनंतर नॅक समितीकडून कला महाविद्यालयास बी ग्रेड प्राप्त झाला.याबद्दल शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन केले जात आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की (दि १४ ) व दि १५ डिसेंबर रोजी नॅक मूल्यांकन तपासणी झाली.नॅक मूल्यांकन समितीचे अध्यक्षा केंद्रीय विद्यापीठ कर्नाटक येथील प्रो.करमला पदमश्री, समिती सदस्य श्री शंकराचार्य विद्यापीठ केरळ येथील प्रो फ्रँसिस ए पी अरकल,समिती सदस्य सोहनलाल दव शासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र पदव्युत्तर महाविद्यालय हरियाणा चे प्राचार्य डॉ विवेक कोहली यांनी महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली. महाविद्यालयाने नॅक मूल्यांकनासाठी चे सर्व निकष पूर्ण केले. सर्व तपासणीनंतर बी ग्रेड प्राप्त झाल्याचे पत्र महाविद्यालयाला प्राप्त झाले आहे. याबद्दल सर्वत्र अभिनंदन केले जात आहे कला



महाविद्यालय नियोजनासाठी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शेख ए आर, बाबुराव आडसकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ फावडे एम जी,श्री राजेश देशमुख,श्री लगस्कर ,श्री गव्हाणे,महाविद्यालयाचे नॅक समन्वयक डॉ ज्ञानेश्वर पांचाळ यांच्यासह बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, कला महाविद्यालय आडस येथील प्राध्यापक व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राज्यातील हवाई दळणवळण वाढविण्यासाठी विमानतळ प्रकल्पाच्या कामांना गती द्या मुख्यमंत्री

## या कामांना केंद्र शासनाबरोबरच राज्य शासनाकडून भरीव स्वरूपाचे सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुंबई, दि. २८ :- राज्यात पायाभूत सुविधांच्या निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर रस्ते, जल, हवाई मार्गांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. राज्याचा प्रत्येक भाग विमानाने जोडण्यासह अस्तित्वातील विमानतळांचे विस्तारीकरण करण्याच्या कामाला गती देण्यात यावी. या कामांना केंद्र शासनाबरोबरच राज्य शासनाकडून भरीव स्वरुपाचे सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात हवाई वाहतुकीच्या वाढीला मोठा वाव आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या उडाण योजनेसह राज्याच्या



निधीतून विमानतळांचा विकास, त्यांचे विस्तारीकण, नाईट लँडिंगची सुविधा, धावपट्टीची लांबी वाढविणे, विमानतळांवर प्रवाशांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे यासारख्या बाबींवर लक्ष केंद्रित करावे. रिलायंसच्या ताब्यात असणारी विमानतळे राज्याच्या ताब्यात घेण्यासाठी महाराष्ट्र उद्योग विकास मंडळाने तातडीने कार्यवाही करावी. मोठ्या शहरांतील विमानतळांवरील भार कमी करण्यासाठी राज्याच्या महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने युद्धपातळीवर कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रत्नागिरी, शिर्डी, अमरावती (बेलोरा), पुरंदर, कराड, चंद्रपूर (मोरवा), सोलापूर, धुळे, फलटण, अकोला, गडचिरोली या विमानतळांच्या कामांच्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा देखील घेतला. मिहान क्षेत्रांतर्गत येणाऱ्या जीएमआर नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी देण्यात येणाऱ्या ७८६.५६ हेक्टर क्षेत्रासंदर्भात करावयाच्या कराराचा आढावा घेतला. यासंदर्भातील करार लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.
बैठकीस वाहतूक विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नगरविकासचे प्रधान सचिव असीम कुमार गुप्ता, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंगल, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, उद्योग विभागाचे सचिव अन्बलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, नागपूरचे जिल्हाधिकारी विपीन इटनकर आदी उपस्थित होते.

--------------------

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com